**SAI TUTORIALS**

Std.: 9 (English) | Marathi | Marks: 50

Date: 24-Sep-2022 MADHUSUDHAN,VEDANT,SVPV,XAVIERS,JEROME,MARY | Time: 2 hrs

Chapter: SEMESTER 1

**विभाग १ - गदय**

**प्र.१ (अ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)**

**1 A1)** चौकटी पूर्ण करा. 1

नानांच्या पश्चात शिरीषने असे ठरवले → [ ] [ ]

त्याप्रमाणे मी परवानगी दिली आणि शिरीष वाजवू लागला. शिरीष कार्यक्रम करण्यात मुरलेल्या एखाद्या वादकाप्रमाणे वाजवत होता. इतके शिकला तरी कुठे याचाच मी विचार करत होतो आणि त्याहीपेक्षा मला मुख्य प्रश्न असा पडला होता, की नवीनच शिकायला लागलेला मुलगा इतके उत्कृष्ट वाजवतो, तर जुने मुरलेले विद्यार्थी किती छान वाजवत असतील, असेच बाहेरचे लोक म्हणत असणार, तेव्हा याच्यानंतर वाजवायला कुणाला बसवावे ? टाळ्यांच्या कडकडाटाने मी भानावर आलो. शिरीष आत आला व त्याने माझ्या पायांवर डोके ठेवले. मी त्याला उठवत विचारले, 'शिरीष, हा काय प्रकार आहे? तू माझ्याकडे न येता आणखीन कुठे शिकत होतास?' डोळे पुशीत शिरीष म्हणाला, 'सर, काय ही भलतीच शंका! मी तुम्हांला सर्व सविस्तर सांगतो-

'ज्या दिवशी मी तुमच्याकडे फी व चिठ्ठी पाठवली, त्याच रात्री नाना वारले. मला धक्काच बसला. ज्यांच्यासाठी शिकत होतो तेच गेल्यावर कशाला आता शिका म्हणून मी व्हायोलिनला हात लावायचा नाही असे ठरवले.

'तुम्हांला कदाचित माहीत असेल किंवा नसेलही! माझे नाना एकेकाळी उत्कृष्ट गवई होते; पण त्यांना एकदा कसलासा जबर अपघात झाला व त्या अपघातात ते ठार बहिरे झाले. त्यांना काहीही ऐकू येत नसे. ओठांच्या हालचालींवरून त्यांना काही काही शब्द समजत. बहिरेपणाच्या इतर गैरसोईंपेक्षा संगीतसेवा अंतरली याचाच नानांना धक्का बसला. शेवटी त्यांनी मला काही तरी वाद्य शिकण्यासाठी उद्युक्त केले. कोणीतरी संगीतशास्त्रासाठी सतत धडपड करत असल्याचे पाहाण्यातच त्यांना अमाप सौख्य मिळत होते, म्हणूनच ते रोज माझ्याबरोबर इथे येत होते; पण त्यांना ऐकू काहीच येत नव्हते. त्यामुळे मला वारंवार खेद व्हायचा, की मी वाजवण्यात कितीही प्रगती व कौशल्य दाखवले तरी माझे नाना काही ते ऐकू शकत नाहीत, या विचाराने मला नानांसमोर मोकळेपणा वाटत नव्हता!'

**A2)** i) आकृती पूर्ण करा. 1

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिरीषवर झालेला परिणाम → [ ] [ ]

ii) कोण ते लिहा. 1

i. शिरीषला वाघ शिकण्यासाठी उदयुक्त करणारे - [ ]

ii. टाळ्यांच्या कडकडाटाने भानावर येणारे - [ ]

**A3)** स्वमत 3

शिरीषची भूमिका तुम्हाला कोणता संदेश देते, ते तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1) कृति पूर्ण करा. 2

1) या उता-यात आलेली घोषवाक्ये - अ) .............. ब) ..............

2) ही परावलंबी वृत्ती आहे. - अ) .............. ब) ..............

`काम करा काम, घाम गाळा घाम` हा विकासासाठी आवश्यक असलेला घोषमंत्र आहे. कामासाठी दुसऱ्याकडे बोट दाखवायचे आणि आराम स्वतःसाठी राखून ठेवायचा अशी पोशखी, आळशी, परावलंबी वृती अनेकांची दिसून येते. माणसातील चिकाटी, बिनचूकपणा, कष्टाळूपणा श्रमदानातून समजतो. कष्टकरी समाज राबत असतो आणि त्याच्या श्रमांवर अनेकजण मजेत राहतात. आधी काम आणि मग थोडासा आराम हे प्रत्येकाने स्वतःला बजावत मनापासून काम करायला हवे. श्रमदानाच्या वेळी बुध्दिजीवींना आपल्या उणिवा कळतात आणि श्रमजीवींचे महत्व कळते. `आराम हराम है` हे पंडितजीचे वाक्य लक्षात ठेऊन आळस झटकून, काम करा काम, घाम गाळा घाम असे म्हणत कामाला लागा

2) कोष्टक पूर्ण करा. 2

1) हे माणसाने स्वतःला बजावायला हवे - [ ]

2) श्रमदानाच्यावेळी बुद्धिजीवींना समजते ते - अ) .............. ब) ..............

**विभाग २ - पदय**

**प्र. २ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)**

1 **A1)** i) सत्य की असत्य ते लिहा. 1

i. संत बहिणाबाई संत एकनाथांच्या गुरू आहेत.
ii. किंकर संत जनार्दन आहेत.

ii) एका शब्दात उत्तरे लिहा. 1

i. वारकरी संप्रदयाचा फडकतो आहे.
ii. भजन करायचे आहे.

संतकृपा झाली ।
इमारत फळा आली ॥१॥

ज्ञानदेवें रचिला पाया ।
उभारिलें देवालया ॥२॥

नामा तयाचा किंकर ।
तेणें रचिलें तें आवार ॥३॥


जनार्दन एकनाथ ।
खांब दिधला भागवत ॥४॥

तुका झालासे कळस ।
भजन करा सावकाश ॥५॥

बहिणी म्हणे फडकती ध्वजा ।
निरूपणा केलें बोजा ॥६॥

**A2)** खालील संकल्पना स्पष्ट करा. 2

(परिसर प्रचाराने व्यापक केला, परिपूर्ण वैभवापर्यंत पोहोचवला, वारकरी संप्रदायाची स्थापना, संप्रदायाला गुरूकृपेने बळकट केले)




**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

i. संतकृपा - ............... .
ii. पाया - ............... .
iii. देवालय - ............... .
iv. किंकर - ............... .

**A4)** स्वमत 2

संतांचे कार्य नेहमीच मार्गदर्शक ठरते, याविषयी तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

**(आ) कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा** **(8)**

व्यायामाचे महत्त्व कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

१) कवितेचे कवी/कवयित्री (१ गुण)
२) कवितेचा विषय (१ गुण)
३) कविता आवडण्याची व न आवडण्याची कारणे (२ गुण)
४) कवितेतील संदेश (२ गुण)
५) दिलेल्या ओळींचा अर्थ लिहा (२ गुण)

व्यायामे जडत्व जाई दूरी । व्यायामे अंगी राहे तरतरी ।

**विभाग ३ - पूरक पठन**

**प्र. ३** **खालील कोणत्याही एक कृती सोडवा.** **(3)**

थोडक्यात उत्तरे लिहा.
प्रस्तुत पाठातील व्यंगचित्रांपैकी तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही एका व्यंगचित्राचे तुम्ही केलेले निरीक्षण बारकाव्यासह स्वतःच्या शब्दांत लिहा.

**2)** थोडक्यात उत्तरे लिहा.
'प्राण्यांचे गंधज्ञान' या संकल्पनेबाबत तुमचे मत लिहा.

**विभाग ४ - भाषा अध्यन (व्याकरण)**

**प्र. ४** **व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**1. वाक्यांचे प्रकार ओळखा.** **(2)**

दररोज व्यायाम करा.

**2. समानार्थी शब्द लिहा.** **(1)**

i. दुर्भिक्ष - ...............
ii. ओढ - ...............


**3. वाक्यरुपांतर -** **(2)**

**1)** i. आदल्या रात्री खूप पाऊस पडला होता. (उद्गारार्थी)
ii. जंगलात जाणे कठीण होते (नकारार्थी)

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र. ५ खालील लेखनप्रकारांपैकी कृती सोडवा.**

**(अ) खालील विषयावर पत्र लिहा.** **(5)**




**(आ) मुलाखत** **(5)**

सर्कशीतील विदुषकाची मुलाखत.